**मोटार अपघात दावा क्र.१२०/२०२१**
**पुजा व ईतर वि. सुरेश व ईतर**
**नि.क्र.४६**

**गैरअर्जदार क्र.२ तर्फे साक्षीदार क्र.१ ची जबानी**
**मी याद्वारे शपथेवर निवेदन करतो की,**

नाव- सुरेश हरि भाकरे
वय- ४१ वर्षे,
व्यवसाय- शेती,
राहणार- देवगाव, ता.बार्शी जि.सोलापूर

**गैरअर्जदार क्र.२ तर्फे सरतपासणी विधीज्ञ श्री.एस.जी.डोईजोडे यांच्या वतीने**

१. मला न्यायालयाचे साक्षी समन्स प्राप्त झाले. मला पक्षकार म्हणून सुध्दा न्यायालयाकडून साक्ष समन्स मिळाले होते आणि त्यात मी वकिलातर्फे हजर झालो. मी वकिलांना जबाब दावा दिला होता. दाव्यातील मागणीची कल्पना मला नाही. अपघातानंतर मी घटनास्थळावरून निघून गेलो. सदर अपघात माझ्या हातातून झाला. पोलीसांनी माझ्या विरूध्द अपघाताचा गुन्हा नोंदविला. फौजदारी खटल्यात मी हजर झालो आणि प्रकरण प्रलंबित आहे. त्यात मी गुन्हा कबूल न केल्यामुळे ते प्रकरण सद्या साक्ष पुराव्यासाठी प्रलंबित आहे. या अपघातात मयताचासुध्दा योगदानात्मक निष्काळजीपणा आहे.

**अर्जदारातर्फे उलट तपास विधीज्ञ श्री.ए.आर.शेख यांच्या वतीने**

२. हे म्हणणे खरे नाही की, अपघातात मयताचासुध्दा योगदानात्मक निष्काळजीपणा आहे हे मी खोटे सांगितले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा अपघात हा केवळ माझ्या निष्काळजीपणामुळे घडला. घटनास्थळावरील लोक मला मारहाण करतील म्हणून मी अपघात घडल्यानंतर घटनास्थळावरून निघून गेलो. या अपघातात माझी चुक असल्यामुळे पोलीसांनी माझ्या विरूध्द गुन्हा नोंदविला.

**मोटार अपघात दावा क्र.१२०/२०२१**

**पुजा व ईतर वि. सुरेश व ईतर**

**नि.क्र.४६**

**<u>गैरअर्जदार क्र.१ व त्यांचे विधीज्ञ पुकारले असता गैरहजर.उलट तपास नाही.</u>**

**उलट तपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत केले.

स्वाक्षरित/-
(साजिद आ. सैय्यद)
जिल्हा न्यायाधीश-४ व
सदस्य, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण,
लातूर.

दि.२०.०७.२०२६